शोषित पिडीतांचा आधार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ, निर्भिड परखड विचाराचे



RNI-MAHMAR/2013/584-13

साप्ताहिक

# अधिराज्य

www.adhirajyanews.com

## दिवाळी विशेषांक 2020

साप्ताहिक
# अधिराज्य
दिवाळी विशेषांक 2020

**संपादक**
भालचंद्र दत्तात्रय सावंत

**कार्यकारी संपादक**
दयानंद कनकदंडे

**विशेष संपादन सहाय्य**
दिपक कसाळे
मोहिनी कारंडे

**संपादक मंडळ**
विष्णु श्रीमंगले
अरुण कांबळे
ज्ञानेश्वर येवले
चंदन घोडके
डॉ. कालिदास शिंदे

**अक्षरजुळणी**
प्रिंटींगवाले, सदाशिव पेठ, पुणे.
9579688881

**मुखपृष्ठ**
अधिराज्य टीम

**प्रकाशक**
साप्ताहिक अधिराज्य
श्रीगोंदा, अहमदनगर
9226045690

**मुद्रक**
भार्गवी प्रिंटींग प्रेस,
श्रीगोंदा, अहमदनगर

**प्रमुख वितरक**
हरिती मीडिया ॲण्ड टेक्नॉलॉजि प्रा. लि., पुणे.

या अंकात व्यक्त झालेल्या मतोंशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सर्व वादविवाद अहमनगर न्यायालयाच्या कक्षेत.

# अंतरंग

भ्रष्ट व्यवस्था आणि नागरिकांची जबाबदारी 7
अशासकीय संस्थांच्या कामातील अडथळे 10
राष्ट्रीय शैक्षणिक धोरण मसुदा 2019 व उच्च शिक्षण 14
भारताचे पर्यावरण धोरण 20
शाळाबाह्य मुले 27
सोशल मीडिया आणि तरुणाई 30
पडली पालं, मांडला डाव नव्यानं पुन्हा! 34
कष्टकऱ्यांची व्यसनाधीनता 38
काम हाताला, सन्मानाने जगण्याला... 53
महाराष्ट्रातील भटके विमुक्त आणि जातीअंताचा प्रश्न 78
विमुक्त भटक्या जमातीच्या पालावर दीप उजळेल का! 86
इतिहासाकडे पाहण्याची वास्तववादी दृष्टी देणारी पर्व 88
मनाचे शोक आधाराच्या शोधात... 91
प्रशासकीय व्यवस्था आणि भ्रष्टाचार 95
कायद्याचं बोला; पण तारतम्य बाळगून 99
बेरोजगारी आणि सरकारपुढील आव्हाने 102
काळा पैसा येतो कुठून आणि कसा? 105
जीवन महत्त्वाचे, जीवनशैली नव्हे! 111
भकास शहरे, उदास गावे 115
मानवी हक्काचा इतिहास 123
प्रश्न बेघर महिलांचे 128
बुलेट ट्रेन विरोधी आंदोलन 132

**स्वागत मूल्य : ₹ 200/-**

आहे.

**पाटील इस्टेट वस्तीः** 1965-70 च्या दशकात ही वस्ती वसली. त्यावेळी 50 एक झोपड्या व बांबू चटई ची घरे उभी राहिली. पाटील नावाच्या व्यक्तीची ही जागा होती म्हणून या वस्तीला पुढे 'पाटील इस्टेट' असे नाव पडले असे वस्ती मध्ये मागील 40 वर्षांपासून राहणाऱ्या मंगल जाधव यांनी सांगितले. पाटील कुटुंबियांनी ही जागा COEP इंजिनिअरिंग महाविद्यालयाला विकली. काही वर्षांनी (2007) वस्तीसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA) प्रस्ताव टाकला गेला व त्याला स्थगिती देखील दिली गेली. सद्या कागदोपत्री ही जागा इंजिनिअरिंग महाविद्यालयाकडे आहे. 1972 च्या दुष्काळानंतर बीड, अहमदनगर, सोलापूर, जालना, औरगांबाद, उस्मानाबाद, लातूर या भागातून सर्वाधिक स्थलांतरित लोक या वस्तीमध्ये राहायला आले. वस्ती वाढत गेली आणि वस्तीमधील लोकांचे अनेक नातेवाईक व ओळखीचे लोक देखील वस्तीमध्ये येत राहिले. साधारणपणे एक ते दीड एकरमध्ये ही वस्ती पसरलेली असून 1150 घरे आणि 5000 हजार लोकांचे वास्तव येथे आहे. कमीत कमी जागेत एका घरावर पोटमाळा काढून जास्तीत जास्त लोक याठिकाणी वास्तव्य करताना दिसतात. पुणे शहराच्या मध्यवर्ती ही वस्ती असल्याने शिवाजीनगर, मॉडेल कॉलनी, डेक्कन, गोखलेनगर, औंध, बाणेर बालेवाडी, भोसलेनगर या भागात धुणंभाडी, रिक्षाचालक, ड्रायव्हर, सुरक्षारक्षक, कचरा गोळा करणे, कुरिअर सेवा, दुकानात काम, टेम्पो सेवा आणि हाऊसकिंपीग अशा विविध सेवा यावस्तीमधील लोक देताना दिसतात.

पाटील इस्टेट वस्तीचा भौगोलिकदृष्ट्या विचार करता वस्तीच्या उत्तरेला मुळानदी आहे. पूर्वेला संगमवाडी उड्डाणपूल आहे तर पश्चिमेला इमरसन आयटी कंपनीची भलीमोठी भिंत आहे तर वस्तीला नियमित किंवा आपतकालीन परिस्थितीमध्ये बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग दक्षिणेला आहे. 2018 मध्ये वस्तीमध्ये आकस्मित आग लागून 280 घरे जळून खाक झाली होती. 2019 मध्ये जेव्हा मूळा नदीला पूर आला त्यावेळी निम्मी वस्ती पाण्याखाली गेली होती. अशा प्रसंगाना नियमित सामोरे जाण्याची जणू वस्तीला सवयच झाली आहे असे वस्तीमध्ये राहणाऱ्या जहिरा शेख यांचे म्हणणे आहे. व्यसनाधिनतेचा विचार करता वस्तीमधील 72 टक्के कुटुंबे व्यसनग्रस्त आहेत. व्यसनाधिनतेचे प्रमाण वस्तीत जास्त आहे. निरक्षरता, बेरोजगारी, बालविवाह, अंधश्रद्धा अशा अनेक समस्यांनी देखील ही वस्ती ग्रस्त आहे. म्हणून वस्तीमधील अंमली पदार्थांचे सेवन आणि त्याचे सामाजिक, शारीरिक, मानसिक, शैक्षणिक, आर्थिक परिणामांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न पुढे केला आहे. त्याची अभ्यासपद्धती पुढीलप्रमाणे.

अभ्यासपद्धती आणि संस्थेची भूमिकाः पुणे शहरातील जवळपास 40 वस्त्यांमध्ये मागील दहा वर्षे कचरा गोळा करणाऱ्या तळागाळातील लोकांबरोबर लेखकांना (विष्णू आणि मालती) काम करण्याचे अनुभव असल्याने व्यसनाधिनता या समस्येबद्दल जवळून माहिती होती. विष्णू श्रीमंगले यांच्या घरात वडील आणि मोठ्या भावाचे व्यसनाधिनतेमुळे निधन झालेले असल्याने या विषयाची गांभीर्यता होती. प्रस्तुत अभ्यास व कामामागे ही एक प्रमुख प्रेरणा आहे.

या अभ्यासासाठी ऐतिहासिक, विश्लेषणात्मक, निरीक्षणात्मक, सहभागात्मक व संख्याशास्त्रीय पद्धतींचा वापर केला आहे. प्रस्तुत अभ्यासासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा उपयोग केला आहे. वस्तीमधील साधारणतः 1150 घरांपैकी 887 कुटुंबांतील 3641 लोकांकडून प्रश्नावली (23 प्रश्नांची) भरून माहिती संकलन केले. प्रश्नावलीमध्ये सामाजिक व आर्थिक प्रश्न, व्यसनाधीनतेचे प्रकार, व्यसनांवर होणारा खर्च, कौटुंबिक हिंसा, आरोग्याच्या समस्या, कुटुंबांवर व्यसनांचा होणारा परिणाम अशा स्वरुपाचे प्रश्न विचारण्यात आले. पाटील इस्टेट वस्तीमध्ये प्रश्नावली भरताना वस्तीमधील चार मुली (प्रज्ञा, प्रतिक्षा, जोत्स्ना, काजल) व एक मुलगा (आदिनाथ) अशा उच्चशिक्षित तरुणाईंचे सहकार्य

घेतले. त्यामुळे जास्तीत जास्त योग्य व खरी माहिती मिळण्यास मदत झाली. वस्तीमधील मुलांच्या सहाय्याने संस्थेला वस्तीमध्ये काम उभे करणे सोप्पे झाले आणि आज हीच मुले संस्थेमध्ये कार्यरत आहेत. प्रश्नावली द्वारे जे तथ्य संकलन केले त्या तक्त्यांचे महत्त्वपूर्ण निष्कर्ष खालीलप्रमाणे काढलेले आहेत.

**तक्ता क्र. 1: शिक्षणाचे प्रमाण**

| शिक्षण | पुरुष | स्त्री | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| लागू नाही (लहान मुले) | 98 | 98 | 196 | 5% |
| अशिक्षित | 285 | 459 | 744 | 21% |
| 1 ली ते 5 वी | 269 | 247 | 516 | 14% |
| 6 ते 9 वी | 691 | 622 | 1313 | 36% |
| 10 वी | 278 | 182 | 460 | 13% |
| 12 वी | 141 | 100 | 241 | 7 % |
| तांत्रिक शिक्षण | 0 | 4 | 4 | .1% |
| पदवीधर | 101 | 56 | 157 | 4% |
| पदव्युत्तर | 3 | 7 | 10 | .3% |
| **एकूण** | **285** | **459** | **3641** | **100** |

तक्ता क्र. 1 नुसार पदवीच्या पुढील शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण फक्त 4 टक्के आहे. शिक्षणाचा स्त्री आणि पुरुष असा विचार करता इयत्ता 9 वी च्या पुढील शिक्षणात मुलींची गळती दिसून येते. 10 वी नतंर अनेक मुलींचे लग्न केले जातात असे अनेक महिलांनी सांगितले. इयत्ता 12 वी च्या पुढील शिक्षणात स्त्री आणि पुरुष दोघांचेही वस्ती पातळीवर मोठ्या प्रमाणात गळती दिसून येते. अशिक्षितांचे प्रमाण 21 टक्के आहे तर फक्त 13 टक्के लोकांनी फक्त 10 वी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहेत.वस्तीतील शिक्षणाचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता शिक्षण घेऊन पुढे काही तरी वेगळे करण्यापेक्षा वस्तींमधील इतर लोकांप्रमाणेच अंगमेहनतीचे व विविध सेवा पुरवण्याचे काम नवीन पिढी करताना दिसते.

**तक्ता क्र. 2: जातीगट**

| जातीगट | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|
| खुला गट | 254 | 7% |
| इतर मागासवर्गीय | 103 | 3 % |
| अनुसुचित जाती | 2147 | 59 % |
| मुस्लिम | 1066 | 29 % |
| सिख, ख्रिश्चन | 37 | 1% |
| भटके विमुक्त | 34 | 1 % |
| **एकूण** | **3641** | **100** |

तक्ता क्र. 2 नुसार जातीगटानुसार वस्तीचा आढावा घेता 59 टक्के लोक हे अनुसूचित जाती गटातील आहेत. जातीनुसार वर्गीकरण करता असे लक्षात येते की, सर्वाधिक मातंग व महार समाजाचे लोकसमूह या वस्तीमध्ये राहतात. त्याचप्रमाणे त्यांच्यामध्ये रक्तनातेसंबंध असलेल्या लोकांची संख्या सर्वाधिक आहे. त्यानंतर 30 टक्के मुस्लिम, शीख व ख्रिश्चन समाजाचे लोक राहतात. याचा अर्थ महार, मातंग आणि मुस्लिम समाज या तीन जातीसमूहातील 85 टक्के लोकवस्ती पाटील इस्टेट मध्ये राहत आहे.

**तक्ता क्र. 3: व्यवसाय**

| व्यवसाय | पुरुष | स्त्री | एकूण | एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| अस्वच्छ व्यवसाय काम | 236 | 467 | 703 | 19% |
| | 33.57 | 66.42 | 100.0 | |
| गृहणी | 0 | 438 | 438 | 12% |
| ड्रायव्हर | 175 | 0 | 175 | 5% |
| धुणभांडी काम | 0 | 138 | 138 | 4% |
| बांधकाम | 104 | 10 | 114 | 3% |
| सुरक्षारक्षक | 113 | 0 | 113 | 3% |
| दुकान संबंधित काम | 80 | 31 | 111 | 3% |
| कौशल्यकाम | 52 | 15 | 67 | 2% |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| गॅरेज काम | 25 | 0 | 25 | 1% |
| अकाऊंट काम | 10 | 2 | 12 | 1% |
| हॉस्पिटल काम | 2 | 18 | 20 | 1% |
| माथाडी काम | 20 | 0 | 20 | 1% |
| कुरिअर, सांस्कृतिक, शिक्षक, पोलिस | 30 | 4 | 34 | 2% |
| शिक्षण घेणारे/ वयस्कर | 880 | 791 | 1671 | 46% |
| **एकूण** | **1727** | **1914** | **3641** | **100%** |
| | 47.4 | 52.6 | 100.0 | |

तक्ता क्र. 3 नुसार वस्तीमधील लोकांचे व्यवसायाचे एकूण स्थान पाहता अस्वच्छ व्यवसाय किंवा स्वच्छता व्यवसायाशी निगडित सर्वाधिक 19 टक्के लोक काम करतात. त्यामध्ये महिलांचे प्रमाण सर्वाधिक आहे. उदा. कचरावेचक, सफाई कामगार, हाऊसकिंपीगचे काम करणारे इ. ड्रायव्हरचे काम करणारे म्हणजे रिक्षा चालवणारे, टेंम्पो चालवणारे, ओला किंवा उबेरच्या गाडीवर काम करणारे जवळपास 5 टक्के लोक आहेत. एकूणच वस्तीमध्ये अंगमेहनतीचे काम करणारे किंवा शहरांमधील लोकांना सर्व प्रकारच्या सेवा देणारे कामगार मोठया प्रमाणात राहतात.

**तक्ता क्र. 4: व्यसनांचे स्त्री-पुरुष प्रमाण**

| व्यसनांचे प्रकार | पुरुष | स्त्री | एकूण | व्यसनांची एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| एकापेक्षा जास्त व्यसन करणारे | 214 | 79 | 293 | 28.4 |
| | 73.0 | 27.0 | 100 | |
| तंबाखु | 117 | 136 | 253 | 24.7 |
| | 46.4 | 53.6 | 100.0 | |
| मशेरी (तपकीर) | 10 | 239 | 249 | 24.3 |
| | 4.0 | 96.0 | 100.0 | |
| विमल (गुटका) | 98 | 24 | 123 | 12.0 |
| | 79.5 | 20.5 | 100.0 | |
| दारू | 78 | 1 | 79 | 7.7 |
| | 98.7 | 1.3 | 100.0 | |
| सिगारेट | 17 | 0 | 17 | 1.7 |
| | 100.0 | 0 | 100.0 | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| गांजा | 11 | 0 | 11 | 1.1 |
| | 100.0 | 0 | 100.0 | |
| **एकूण** | **546** | **484** | **1025** | **100.0** |
| | 53.0 | 47.0 | 100.0 | |

**तक्ता क्र. 4.1: व्यसनांचे प्रकार**

| **व्यसनांचे प्रकार** | **एकूण** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| सर्व प्रकारचे दारू | 241 | 23.5 |
| तंबाखु, सिगारेट, मशेरी, विमल (गुटका), बिडी | 754 | 73.5 |
| गांजा | 30 | 3.0 |
| **एकूण** | **1025** | **100** |

तक्ता क्र. 4 नुसार वस्तीमधील व्यसनाधीनतेचे प्रमाण बघता तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणाऱ्यांचे प्रमाण 73 टक्के आहे तर तक्ता क्र. 4.1 नुसार मशेरी या पदार्थांचे सेवन करण्याचे प्रमाण 96 टक्के महिलांमध्ये आहे. ब्रिटनमधील 'हुलयॉर्क मेडिकल स्कूल'च्या सार्वजनिक आरोग्य विभागाचे संशोधन प्रमुख कामरान सिद्दिकी यांच्या मतानुसार जगभरात दरवर्षी सात लाखांहून अधिक नागरिक तंबाखू सेवनाने होणाऱ्या विकारांमुळे मृत्यूमुखी पडतात आणि त्यापैकी 75 टक्के नागरिक भारतातील आहेत. (लोकसत्ता; 24 ऑगस्ट 2015) या अभ्यासाचे चित्र पाटील इस्टेट मध्ये दिसून येते. तक्ता क्र. 4 नुसार एकूण व्यसन करणाऱ्या लोकांमध्ये एकापेक्षा जास्त व्यसन करणारे 293 लोक म्हणजेच 28 टक्के आहेत. ही फारच गंभीर गोष्ट असून याबाबत लोकांनी असे सांगितले की, कोणत्याही व्यसनाची सुरुवात एका पदार्थापासून होते. त्या पदार्थाची सवय लागल्यानंतर अशी मानसिकता तयार होते की पैसे उपलब्ध नसतात जेव्हा ते पदार्थ आपल्याला विकत घेणे सहज शक्य होत नाही तेव्हा कमी पैशात सहज उपलब्ध होणाऱ्या एखाद्या दुसऱ्या पदार्थाची सवय लागली जाते.

सर्व प्रकारच्या दारुचे व्यसन करणारे एकूण 241 (23.5 टक्के) लोक वस्तीमध्ये आहेत. तंबाखुजन्य पदार्थांच्या सेवनाचा कल 73 टक्के असून देखील महिला असे सांगतात की आमची तंबाखू किंवा मशेरीमुळे कोणाला त्रास होत नाही पण दारू पिणाऱ्या माणसांचा सगळ्यांना त्रास होतो. स्त्री आणि पुरुषांमध्ये व्यसनांचे प्रमाण जवळपास सारखे दिसते पण दारुवर होणारा खर्च जास्त आहे, पुरुषांना नियमित शारीरिक आजारांना सामोरे जावे लागते. त्यामुळे कुटुंबाची आर्थिक परिस्थिती खालावते, दारु पिऊन वस्तीमध्ये नियमित भांडण करण्याची जणू लोकांना सवयच झाली आहे असे अनेक महिलांनी सांगितले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे व्यसन करणाऱ्या लोकांच्या आर्थिक, सामाजिक आणि मानसिक त्रासांचा कुटुंबामधील सदस्य व वस्तींमधील इतर लोकांना नेहमीच त्रासाला सामोरे जावे लागते. तरुण पिढी यामध्ये सहज अडकत असून संपूर्ण वस्तीच व्यसनाच्या विळख्यात सापडत आहे. तक्ता क्र. 5 नुसार वस्तीमधील 25 वयोगटाच्या आतील 177 तरुणांना कोणत्या ना कोणत्या व्यसनाची लागण झालेली आहे. तक्ता क्र. 6 नुसार एकूण कुटुंबामध्ये 72 टक्के कुटुंबामध्ये कोणी ना कोणी व्यसनी आहे. त्यामुळे व्यसन करणाऱ्या लोकांमुळे संपूर्ण वस्तीलाच अनेक प्रकारच्या त्रासांना सामोरे जावे लागते. व्यसनाधिनतेबाबत विचार करताना संपूर्ण वस्तीच व्यसनांच्या विळख्यात सापडलेली दिसते. व्यसन न करणारे कायमच (At Risk) धोक्याच्या टप्प्यावर असतात कारण ते कधीही याच्या आहारी जाऊ शकतात. म्हणून व्यसनमुक्तीचा विचार करताना नव्याने व्यसनाधिनता वाढू नये यासाठी या धोक्याच्या टप्प्यावर असलेल्या गटाचा विचार करावा लागतो. (टिपणः कधीकधी (Occassionally) महिन्यातून एखाद्या वेळेस एखाद्या पदार्थांची सेवन करणे ही संकल्पनाच वस्तीमध्ये लागू होत नाही)

**तक्ता क्र. 5: वयोगट**

| **कुटुंबात कोणी व्यसनी आहे का?** | **एकूण कुटुंब संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| हो आहेत | 562 | 71.7 |
| नाहीत | 222 | 28.3 |
| **एकूण** | **784** | **100** |


**तक्ता क्र. 6**

| वयोगट | व्यसन करतो | व्यसन करत नाही | एकूण |
|---|---|---|---|
| 1-15 | 14 | 1015 | 1029 |
| 16-20 | 56 | 417 | 473 |
| 21-25 | 107 | 321 | 428 |
| 26-30 | 180 | 279 | 459 |
| 31-40 | 306 | 285 | 591 |
| 41-50 | 187 | 154 | 341 |
| 51-60 | 100 | 89 | 189 |
| 61+ | 75 | 56 | 131 |
| **एकूण** | **1025** | **2616** | **2641** |

**तक्ता क्र. 7: किती वर्षांपासून व्यसन आहे**

| किती वर्षांपासून व्यसन करत आहात | पुरुष | स्त्री | एकूण | व्यसन टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 वर्षापासून | 22 | 28 | 50 | 5.0 |
| | 44.0 | 56.0 | 100.0 | |
| 2 वर्षे | 36 | 22 | 58 | 6.0 |
| | 62.1 | 37.9 | 100.0 | |
| 3 वर्षे | 25 | 17 | 42 | 4.0 |
| | 59.5 | 40.5 | 100.0 | |
| 4 वर्षे | 20 | 15 | 35 | 3.0 |
| | 57.1 | 42.9 | 100.0 | |
| 5 वर्षे | 61 | 46 | 107 | 10.0 |
| | 57.0 | 43.0 | 100.0 | |
| 5-8 वर्षे | 48 | 39 | 87 | 9.0 |
| | 55.2 | 44.8 | 100.0 | |
| 8-10 वर्षे | 51 | 28 | 79 | 8.0 |
| | 64.6 | 35.4 | 100.0 | |
| 11-15 वर्षे | 67 | 61 | 128 | 13.0 |
| | 52.3 | 47.7 | 100.0 | |
| 16-20 वर्षे | 90 | 72 | 162 | 16.0 |
| | 55.6 | 44.4 | 100.0 | |
| 21-25 वर्षे | 58 | 70 | 128 | 12.0 |
| | 45.3 | 54.7 | 100.0 | |
| 26-30 वर्षे | 12 | 22 | 34 | 3.0 |
| | 35.3 | 64.7 | 100.0 | |
| 31-35 वर्षे | 14 | 20 | 34 | 3.0 |
| | 41.2 | 58.8 | 100.0 | |
| 36+ वर्षे | 39 | 42 | 81 | 8.0 |
| | 48.1 | 51.9 | 100.0 | |
| **एकूण** | **543** | **482** | **1025** | **100.0** |
| | 53.0 | 47.0 | 100.0 | |

तक्ता क्र. 7 नुसार व्यसन करण्याची सवय किती वर्षांपासून लागली आहे याचा आढावा घेतला असता 28 टक्के लोकांना मागील पाच वर्षांपासून व्यसन आहे. 28 टक्के लोकांना 5 ते 25 वर्षांपासून व्यसन आहे. 14 टक्के लोकांना 26 वर्षांपेक्षा जास्त वर्षांपासून व्यसन आहे. यावरून आपण असे म्हणू शकतो की, वस्ती मध्ये व्यसन करण्याचे प्रमाण आणि त्याचा कालावधी फार मोठा आहे. त्यामुळे लहान मुलांना खुप लहान वयापासून विविध व्यसने जवळून बघण्याचा योग आला. अगदी लहान वयात व्यसनाची सुरुवात झाली असे वस्तीतील नागरीक दुबळे यांनी सांगितले. उद्याच्या देशाचे भविष्य असलेली तरुणाईं व्यसनाधीन होऊ नये किंवा नुकतेच याचा भाग झालेले आहेत पण त्यांना यातून बाहेर पडायचे आहे त्यांच्याबरोबर काम करणे गरजेचे आहे. स्त्री आणि पुरुष अशी तुलना करता स्त्रियांच्या तुलनेत पुरुष जास्त व्यसनी आहेत पण कालमऱ्यादा पाहता 21 वर्षांपेक्षा जास्त काळापासून व्यसन करण्याचे प्रमाण महिलांमध्ये जास्त आहे तर 20 वर्षांपेक्षा कमी कालावधी पुरुषांमध्ये जास्त असल्याचे निदर्शनास आले. याबाबत वस्तीमधील मंगल जाविर यांनी सांगितले की स्वस्त असल्याने आणि काम करताना तरतरी येण्यासाठी मशेरी आणि तबांखुची सवय अनेक महिलांना अगदी लहान वयात लागते. अनेक महिलांनी लग्नाआधीच आम्ही मशेरी लावायला सुरुवात केली होती अशी उत्तरे दिली. नियमित थुंकायची सवय लागल्याने शरीरातील पाण्याची पातळी कमी होणे, जिभेची चव जाणे, भूक न लागणे, चिडचिड होणे



अशा त्रासाला अनेक महिला सामोरे जाताना दिसले. वस्तीमध्ये लहान वयात सुरु झालेले व्यसन अनेक (30 वर्षांहुन अधिक) वर्षे चालू असलेले लक्षात आले.

तक्ता क्र. 8ः व्यसनांवर होणारा खर्च

| व्यसनावर होणारा महिन्याचा खर्च | पुरुष | स्त्री | एकूण |
|---|---|---|---|
| 200 पेक्षा कमी | 74 | 220 | 294 |
| | 25.5 | 74.5 | 100.0 |
| 201-500 | 142 | 166 | 308 |
| | 46.1 | 53.9 | 100.0 |
| 501-800 | 76 | 59 | 135 |
| | 56.3 | 43.7 | 100.0 |
| 801-1000 | 60 | 12 | 72 |
| | 83.3 | 16.7 | 100.0 |
| 1100-1500 | 56 | 12 | 68 |
| | 82.4 | 17.6 | 100.0 |
| 1501-2000 | 47 | 8 | 55 |
| | 85.5 | 14.5 | 100.0 |
| 2100-2500 | 13 | 2 | 15 |
| | 86.7 | 14.5 | 100.0 |
| 2600-3000 | 32 | 3 | 35 |
| | 91.4 | 8.6 | 100.0 |
| 3100+ | 41 | 1 | 42 |
| | 97.0 | 3.0 | 100.0 |
| एकूण | 540 | 479 | 1025 |
| | 53.0 | 47.0 | 100.0 |

तक्ता क्र. 8.1

| **व्यसनावर होणारा महिन्याचा खर्च** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| 200 पेक्षा कमी | 294 | 29% |
| 201-500 | 307 | 30% |
| 501-800 | 135 | 13% |
| 801-1000 | 72 | 7% |
| 1100-1500 | 68 | 7% |
| 1501-2000 | 55 | 5% |
| 2100-2500 | 15 | 2% |
| 2600-3000 | 35 | 3% |
| 3100+ | 42 | 4% |
| **एकूण** | **1025** | **100** |


तक्ता क्र. 8 नुसार व्यसनांवर होणार खर्च लक्षात घेता महिना 200 आणि 500 पेक्षा कमी खर्च करणारे लोक जवळपास 59 टक्के असून त्यात सर्वाधिक महिला आहेत. 501 ते 800 पर्यंत महिन्याला व्यसनांवर खर्च करणाऱ्यांची संख्या 13 टक्के आहेत. पण त्यानंतर 801 ते 1000 रु. पर्यंत पैसे खर्च करणाऱ्यांत पुरुषांचे प्रमाण 80 टक्क्याहून अधिक आढळून आले. सर्वसाधारणपणे महिला व पुरूषांमध्ये व्यसन करण्याचे प्रमाण जवळपास समान आहे पण त्यावर होणारा खर्च मात्र महिलांच्या तुलनेत पुरुषांमध्ये सर्वाधिक आहे. व्यसन करणाऱ्या लोकांमध्ये त्या व्यसनाच्या पदार्थाची (वस्तुची) बाजारात किंमत किती आहे यावर ते अवलबूंन आहे त्यामुळे दारू इतर व्यसनांच्या तुलनेत

जास्त महाग आहे. वस्तीमधील मूळ समस्या ही दारु असून दारुबंदी करणे गरजेचे आहे असे अनेक महिलांनी सांगितले पण शासनाचे याबाबत धोरण बघता महाराष्ट्र राज्याला 2019 मध्ये मद्यविक्रीतून 15000 कोटीमहसूल मिळाला (सकाळ, 23 एप्रिल 2020) त्यामुळे महसूलाचा विचार करता सरकार मद्यविक्री बंद करु शकत नाही. कोरोना संकट काळात लॉकडाऊन शिथिल करताना दारुची दुकाने सर्वात आधी सुरु करण्यात आली. डॉ. अभय बंग (सर्च संस्था) आणि डॉ. हमीद दाभोळकर (परिवर्तन व्यसनमुक्ती संस्था) यांनी सांगितले की, शासनाला दरवर्षी जितका महसूल मिळतो त्यापेक्षा पाचपट जास्त किंमत रोग, मृत्यू, गुन्हे, अपघात, आत्महत्या व स्त्रियांवर बलात्कार या स्वरुपात समाजाला मोजावी लागते. शिफ्रीन या अमेरिकेतील अर्थशास्त्रज्ञापासून तर भारतातील नॅशनल इन्स्टीटयूट ऑफ मेंटल हेल्थ ॲन्ड न्युरोसायंसेस, (NIMHNS) या सर्वोच्च संस्थेने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार दारूमुळे मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा दारूची समाजाला व शासनाला मोजावी लागणारी एकूण किंमत जास्त असते.

तक्ता क्र. 9ः व्यसन कोणामुळे लागले

| **व्यसन कोणामुळे लागले** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| एकटेपणामुळे/स्वतःमुळे | 140 | 14.0 |
| आकर्षण | 3 | .3 |
| गरोदरपणात | 4 | .4 |
| कुटुंबांतील ताणतणाव | 21 | 2.0 |
| मित्र/मैत्रीणी | 661 | 65.0 |
| लागू नाही | 7 | .7 |
| कामाचे स्वरूप | 130 | 13.0 |
| कुटुंबांतील लोकांकडून | 13 | 1.0 |
| कामाच्या ठिकाणचे लोक | 46 | 4.0 |
| **एकूण** | **1025** | **100** |

तक्ता क्र.9 नुसार व्यसन कोणामुळे लागले हे तपासले असता मित्र आणि मैत्रीणीमुळे (peer pressure) 65 टक्के लोकांना व्यसन लागलेले दिसते. महिलांमध्ये मशेरी किंवा तंबाखू खाण्याची सवय मैत्रीणींमुळे लागली असे अनेक जणींनी सांगितले. मित्र/मैत्रीणींचा प्रभाव हा व्यसनाधिनमध्ये फार महत्त्वाचा मुद्दा असल्याने त्याचा स्वतंत्र विचार करावा लागतो. 21 लोकांनी तर घरांमध्ये असलेले ताणतणाव दूर होण्यासाठी किंवा त्याचा त्रास सहन न झाल्याने व्यसनाच्या आहारी गेलो असे सांगितलेले आहे. यावरून आपण असे म्हणू शकतो की, वस्ती पातळीवर लोकसंख्येची घनता जास्त असल्याने गर्दी आहे पण एकटेपणा आहे निखळ संवाद नाही, अंगमेहनती सारखे काम केले की प्यावे अशी समजूत निर्माण केली गेली आहे जे खरे तर चुकीचे आहे. कामाच्या ठिकाणचे लोक आणि मित्र मैत्रीणी यांचा वाटा जवळपास 65 टक्के आहे. खरे पाहता वस्तीपातळीवर लोकांचे आर्थिक आणि सामाजिक असुरक्षिततेचे प्रश्न अनेक आहेत. बेकारी आहे, काम नाही, नियमित कामाला न गेल्याने व्यसनी माणसांना काम मिळत नाही, काम न केल्याने घरात किरकिर वाढते, मग आलेला ताणतणाव घालवण्यासाठी मित्रांना भेटायचे आणि व्यसन करायचे. एकदा का तुम्ही तुमच्या मेंदूतील डोपामाईनला (आनंद देणारी लहरी) सतत जागृत करायची सवय लावली की ती गोष्ट परत परत करायची तलफ होते. खरे तर अशा वेळी वस्ती पातळीवर मनोरंजनात्मक पर्याय उपलब्ध असणे जास्त गरजेचे असते.



**तक्ता क्र. 10: कुटुंबाच्या उत्पनांनुसार महिन्याला व्यसनांवरील होणारा खर्च**

| कुटुंबाचे उत्तन्न व्यसनांवरील खर्च | उत्पन्न नाही | 5000- | 6,000 -10,000 | 11,000-15,000 | 16,000-20,000 | 21,000+ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 200 पेक्षा कमी | 68 | 94 | 4 | 0 | 1 | 1 | 290 |
| 201-500 | 65 | 81 | 124 | 29 | 7 | 2 | 308 |
| 501-1000 | 35 | 41 | 83 | 37 | 9 | 2 | 207 |
| 1100-2000 | 14 | 19 | 61 | 25 | 3 | 1 | 123 |
| 2100-3000 | 6 | 5 | 23 | 13 | 3 | 0 | 50 |
| 3100+ | 3 | 3 | 21 | 10 | 3 | 1 | 41 |
| **एकूण** | **228** | **217** | **406** | **132** | **29** | **7** | **1019** |
| **टक्केवारी** | **22.4** | **21.3** | **39.8** | **13.0** | **2.8** | **.7** | **100.0** |

तक्ता क्र. 10 नुसार कुटुंबाचे मासिक उत्पन्न आणि व्यसनांवर होणारा मासिक खर्च तपासला असता असे लक्षात आले की, 61 टक्के लोकांचे मासिक उत्पन्न हे 10 हजारापेक्षा कमी आहे. पण महिन्याला 1000 पेक्षा जास्त पैसे खर्च करणाऱ्या लोकांची संख्या 28 टक्के आहे. घरामध्ये कोणत्याही प्रकारचे काम न करणारे किंवा पैसे न कमावणारे सुद्धा जवळपास 228 जण म्हणजे 22 टक्के लोक आहेत जे घरातील इतर लोकांकडून पैसे घेऊन व्यसन करतात. त्यामध्ये अनेक जण आई किंवा बायकोकडून पैसे घेऊन व्यसन करतात. त्यामध्ये पैशाचा विचार करता 200 रुपये ते 500 रुपये महिना खर्च करणारे सर्वाधिक आहेत. वरील तक्त्यावरुन आणखी एक फार महत्त्वाचा मुद्दा दिसतो. तो म्हणजे 21 हजार पेक्षा जास्त मासिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबामध्ये व्यसनांवर होणार खर्च कमी आहे. या तक्त्यावरून आपण असे म्हणू शकतो की अत्यंत कमी आर्थिक उत्पन्न गटातील हा समूह असून देखील रेशन पेक्षा व्यसनांवर जास्त पैसे खर्च करताना दिसतात.

**तक्ता क्र. 11: व्यसन करता का?**

| तुम्ही व्यसन करता का? | एकूण लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| हो | 1025 | 28.3 |
| नाही | 2616 | 71.8 |
| **एकूण** | **3641** | **100** |

तक्ता क्र. 11.1: व्यसन करता का?

| तुम्ही व्यसन करता का? | पुरुष | स्त्री | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| हो | 546 | 484 | 1030 | 28.3 |
| नाही | 1320 | 1291 | 2611 | 71.8 |
| एकूण | 1866 | 1775 | 3641 | 100 |
| | 51.2 | 48.8 | 100.0 | |

तक्ता क्र. 11 नुसार वस्तीत राहणाऱ्या एकूण लोकसंख्येपैकी 28 टक्के लोकसंख्या व्यसनाच्या अधिन आहे. पण जे 72 टक्के लोक व्यसन करत




नाहीत (कुटुंबांतील सदस्य, लहान मुले, शिक्षण घेणारे, इतर व्यसन न करणारे) यांना वरील 28 टक्के व्यसन करणाऱ्या लोकांच्या त्रासाला कायमच सामोरे जावे लागते. कारण व्यसन करणारी व्यक्ती मानसिक, शारीरिक, आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या पिचलेली असते. त्याच्या दुष्परिणामांची झळ इतर सर्व लोकांना बसते म्हणून व्यसनाचा प्रवास हा एका व्यक्तीपासून सुरु होतो आणि मग तो कुटुंब आणि शेजारपाजार पर्यंत पोहचतो. म्हणून वस्ती पातळीवर कमी जागेत जास्त लोक राहत असल्याने सर्वांनाच या त्रासाला सामोरे जावे लागते. तक्ता क्र. 11.1 नुसार स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांमध्ये व्यसन करण्याचे प्रमाण अधिक आहे. दारुमुळे मृत्यूचे प्रमाण देखील जास्त आहे. दारुमुळे कामावर गैरहजेरी कमी म्हणजे उत्पादक शक्ती कमी, दारुमुळे निर्माण होणाऱ्या आजारांमुळे वैद्यकीय उपचारांचा खर्च, वाहनांचे अपघात, गुन्हे, कौटुंबिक हिंसा आणि घरातील लहान मुलांवर होणारा दुष्परिणाम अशा अनेक त्रासाला सामोरे जावे लागते. ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज यांच्या अभ्यासानुसार मृत्यू व रोगनिर्मितीच्या सर्वोच्च दहा कारणांपैकी दारू व तंबाखु ही दोन महत्त्वाची कारणे आहेत. (अभय बंग; 2016)

**तक्ता क्र. 12: व्यसनांचा ठिकाणाचे अंतर**

| व्यसन करण्याचे ठिकाण | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|
| 10 पाऊलांवर | 228 | 22.3 |
| 20 पाऊलांवर | 243 | 23.8 |
| 30 पाऊलांवर | 202 | 19.5 |
| 40 पाऊलांवर | 127 | 12.4 |
| 50 पाऊलांवर | 220 | 21.5 |
| त्याहुन जास्त | 5 | .5 |
| **एकूण** | | |

तक्ता क्र. 12 नुसार व्यसन करण्याच्या ठिकाणाचे अंतर घरापासून तपासले असता असे लक्षात आले की जवळपास 10 ते 50 पाऊलांवर व्यसन करण्याचे ठिकाण आहे. त्यामुळे लोकांना घराच्या अगदी जवळ आणि सहज व्यसन करण्यासाठीच्या वस्तू उपलब्ध असल्याने सहजतेने त्याच्या आहारी जाताना दिसत आहेत. त्यामुळे वस्ती ठिकाणापासूनच व्यसन करण्याचे ठिकाण लांब असल्यास त्यावर नक्कीच काही प्रमाणात नियंत्रण येऊ शकेल. व्यक्तीला एखाद्या पदार्थाच्या सेवनाची सुरुवात करताना ती वस्तू राहण्याच्या ठिकाणापासून किती अंतरावर उपलब्ध आहे याला खुप महत्त्व असते.

**पाटील इस्टेट वस्ती नकाशा क्र. 13**




नकाशा क्र. 13 नुसार पाटील इस्टेटमध्ये एकूण पाच ठिकाणी अवैध हातभट्टी/गावठी दुकाने आहेत. दुकानांची रचना म्हणून विचार करता ती दुकाने नसून एखाद्या घरात दारूविक्री केली जाते. ही दुकाने व्यसन करणाऱ्या लोकांसाठी अत्यंत जवळ असून ती रात्री देखील उघडी असतात. लहान मुले देखील दारु आणायला जाऊ शकतात आणि जातात. शासनमान्यता प्राप्त देशी दारुमध्ये निर्मितीपासून ते विक्रीपर्यंत शासनाचे नियंत्रण असते. अवैध दारूविक्री दुकाने (घर) ही रात्रभर चालू असतात. त्यामुळे अनेक जण तलफ झाली की मध्यरात्री किंवा पहाटे सुद्धा जाऊन दारु पितात असे वस्तीमधील चव्हाण यांनी सांगितले. हातभट्टी दारु निर्मिती व विक्रीमध्ये सर्व प्रकारचे अवैध प्रक्रिया असल्याने अनेक वेळेला विषबाधा होऊन लोकांचा जीव देखील गमवावा लागला आहे. देशभरात याची अनेक उदाहरणे आहेत.

वस्तीच्या बाहेर रोडवर एक शासन मान्य देशी दारूचे दुकान आहे. या व्यक्तिरिक्त तंबाखु, मशेरी, सिगारेट मिळतात असे जवळपास 15 दुकाने वस्तीमध्ये आहेत. यावरून आपण असे म्हणू शकतो की पाटील इस्टेट वस्तीमध्ये लोकांना सहज व चालत जाण्याच्या अंतरावर दारू आणि तंबाखुजन्य वस्तू उपलब्ध होतात. त्यामुळे

व्यसन करण्याकडे लोकांचा कल वाढलेला दिसतो.

**तक्ता क्र. 14: व्यसनमुक्तीसाठी प्रयत्न**

| व्यसनमुक्त होण्यासाठी मदत हवी आहे का? | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|
| हो आहे | 719 | 70.5 |
| नाही /नको | 301 | 29.5 |
| **एकूण** | **1020** | **100** |

**तक्ता क्र. 15: व्यसनमुक्तीसाठी मदत**

| व्यसनमुक्त होण्यासाठी काही प्रयत्न केले होते का? | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|
| हो | 7 | 0.7 |
| नाही | 1006 | 99.3 |
| **एकूण** | **1020** | **100** |

तक्ता क्र. 14 नुसार वस्तीमध्ये व्यसनमुक्त होण्यासाठी वस्ती पातळीवर कोणत्याही प्रकाराचे पर्याय उपलब्ध नाहीत. त्यामुळे देखील या विषयावर काम करणे अत्यावश्यक असल्याचे लक्षात आले. तक्ता क्र. 15 नुसार वस्ती मध्ये व्यसनमुक्त होण्यासाठी मदत हवी आहे असे 70 टक्के लोकांनी सांगितले आहे. त्यामुळे व्यसनमुक्ती कार्यक्रमात काम करताना व्यसन करणाऱ्या व्यक्तीची व्यसन सोडण्याची इच्छा आहे हे फार महत्त्वाचे असते. वस्तीमध्ये अनेक लोकांनी आम्हाला मदत हवी आहे असे सांगितले पण खरी परिस्थिती पाहता संपूर्ण महाराष्ट्रात फक्त 40 व्यसनमुक्ती केंद्रे आहेत ती सेवाशुल्क आकारून सेवा देतात. (दाभोळकर, साधना, 2014) त्यामुळे फक्त पैसे खर्च करू शकतील अशा लोकांना घरापासून लांब अशी केंद्रे उपलब्ध आहेत. वस्तीपातळीवर एक सुद्धा केंद्र असल्याचे ऐकिवात नाही तसेच मोफत केंद्र तर नाहीच नाही. सर्व व्यसनमुक्ती केंद्रे ही शुल्क भरून उपचार करतात त्यामुळे आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या समाजाला व्यसन सोडण्याची इच्छा असून देखील त्यातून बाहेर पडण्याचे मार्गच दिसत नाही.

पुणे महानगरपालिका योजनाः पुणे शहर हद्दीमध्ये राहणाऱ्या मागासवर्गीय समाजातील दारूच्या अधीन असलेल्या लोकांना दारू मुक्त होण्यासाठी पुणे महानगरपालिका समाज विकास विभागाच्या वतीने दहा वर्षापूर्वी 7 हजार रुपयांचे अनुदान दिले जाईल अशी योजना सुरु झाली. या अनुदानाचा लाभ घेण्यासाठी व्यक्तीला व्यसनमुक्ती केंद्रात प्रवेश घ्यावा लागतो. समाज विकास विभागाचे रविंद्र चव्हाण यांनी सांगितले की दर वर्षी फक्त चार ते पाच अर्ज येतात. त्यामध्ये व्यसनमुक्ती केंद्रात राहून उपचार घेतलेले कागदपत्रे, उत्पन्न दाखला, रेशनकार्ड अशा कागदपत्रांची पुर्तता करुन फक्त एक किंवा दोनच अर्ज मान्य होतात.

अशा अनेक योजनांसाठी आर्थिक तरतूद केली जाते. पण काही वेळा निधी असूनही खर्च करण्यासाठी स्वतंत्र आणि सक्षम नोकरशाही यंत्रणा किंवा प्रशासकीय कार्यक्षमता दिसत नाही. राजकीय इच्छाशक्तीचा अभाव दिसतो. दरवर्षी अशा योजनांसाठी केलेल्या आर्थिक तरतूदींमधील 50 टक्के निधी परत जातो. अस्तित्वात असलेल्या योजनांची व्यवस्थित अंमलबजावणी होत नसताना त्यात शासन नवीन योजना जाहीर करतात. दारू विक्रेत्यांशी असलेले हितसंबंध आणि व्यसनाधीन लोकांना न दुखावण्याच्या भूमिकेमुळे अंमलबजावणीवर मऱ्यादा येतात. परिणामी या योजनांचा देखील राजकीय वापर केला जात आहे. म्हणून योजनांच्या अंमलबजावणीत अनेक तांत्रिक अडचणी असल्याने ज्याला खरचं व्यसनमुक्त होण्याची गरज आहे अशा गरीब, कष्टकरी व अशिक्षित लाभार्थ्याला त्या योजनांचा लाभच घेता येत नाही अशी परिस्थिती आहे.

**तक्ता क्र. 16: व्यसन हा आजार की वाईट गुण**

| व्यसन हा आजार आहे की वाईट गुण | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|
| वाईट गुण | 995 | 97.5 |
| आजार आहे | 21 | 2.1 |
| एकूण | 1021 | 100 |

तक्ता क्र. 16 नुसार व्यसन करणे हा एक वाईट दुर्गुण आहे असे 97 टक्के लोकांनी सांगितले. मानसोपचार विशेषज्ञ आणि डॉक्टर यांच्या मते व्यसन हा शारीरीक आजार असून नंतर त्याचा मानसिक आजाराकडे प्रवास होतो. वस्तीमध्ये जेव्हा लोकांच्या अशा प्रतिक्रिया आहेत की व्यसन हा आजार नसून तो एक वाईट गुण आहे. यावरून हे लक्षात येते की, लोकांना याची जाणीवच नाही की आपण व्यसनी आहोत म्हणजे आपल्याला मानसिक आजार झालेला आहे. सामाजिक-आर्थिक विषमता, सतत व्यसन केल्याने वेळेत योग्य आहार न करणे, झोप न लागणे अथवा अधिक झोपणे, अस्वस्थता, सतत दडपणाखाली असणे, गुन्हे घडणे, घरात छोट्या-छोट्या गोष्टीवरून चिडचिड करणे, सतत कौटुंबिक ताणतणाव, एकलकोंडेपणा, भिती पोटी सतत रागराग करणे अशा अनेक गुंतागुंतीच्या कारणांमधून व्यसन हा मानसिक आजार म्हणून पुढे येतो. त्यामुळे व्यसनाधीनतेवर काम करताना मानसिकतेचा विचार होणे फार गरजेचे आहे.

**तक्ता क्र. 17: व्यसनामुळे निधन झाले आहे का?**

| **व्यसनांमुळे कुटुंबात कोणाचे निधन झाले आहे का?** | **एकूण** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| हो | 91 | 8.9 |
| **एकूण** | **1020** | **100** |

तक्ता क्र. 17 नुसार व्यसनांमुळे कोणाचे मृत्यू झाले आहे का? याची माहिती घेतली तेव्हा समजले की 36 अशी कुटुंबे आहेत ज्यांच्या घरात व्यसनामुळे कोणाचे ना कोणाचे निधन झालेले आहे. त्यामध्ये पुरुषांचे प्रमाण सर्वाधिक आहे. 25 वयोगटाच्या आत मध्ये निधन झालेल्या लोकांची संख्या ही 10 आहे. गडचिरोलीमध्ये दारुबंदी चळवळ यशस्वी केलेले सर्च संस्थेचे डॉ. अभय बंग यांच्या मते मागील काही वर्षात तरूण वयोगटात व्यसन करण्याचे प्रमाण वाढलेले आहे. मुक्तागंण व्यसनमुक्ती केंद्राच्या संचालक श्रीमती मुक्ता पुणतांबेकर यांच्या मते मागील 20 वर्षात व्यसन करण्याचे वय खाली आलेले आहे. चंद्रपूर जिल्हात दारुबंदी चळवळ यशस्वी करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या पारोमिता गोस्वामी यांच्या मते सामाजिक माध्यमामुळे आणि आधुनिकीकरणामुळे विरगुंळा म्हणून एखाद्या पदार्थार्ंच्या सेवनाला जणू सामाजिक अधिमान्यता मिळाली असून तरुण वयोगटात व्यसनांचे प्रमाण वाढलेले आहे. 2009 मध्ये भारताच्या आरोग्य मंत्रालयाने केलेल्या राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षणाच्या अहवालानुसार 15 ते 24 वयोगटात व्यसनाधिनतेचे प्रमाण वाढलेले आहे. तक्ता क्र. 5 नुसार तरुण वयोगटात व्यसनांचे प्रमाण जास्त दिसले आहे.

वरील सर्व मुद्यांचा विचार करून 'मनोदय' संस्थेच्या वतीने तक्ता क्र. 7 नुसार अनेक वर्षांपासून व्यसन करणाऱ्या लोकांपेक्षा व्यसनाला नव्याने सुरुवात केलेल्या पहिल्या पाच वर्षातील (292) लोकांवर लक्ष केंद्रित केले आहे. व्यसन न करणारे कायमच (at risk) धोक्याच्या टप्प्यावर असतात कारण ते कधीही याच्या आहारी जाऊ शकतात. म्हणून व्यसनमुक्तीचा विचार करताना नव्याने व्यसनाधिनता वाढू नये म्हणून या धोक्याच्या टप्प्यावर असलेल्या गटाचा विचार करावा लागतो. वस्तीमध्ये कुमार वयातून किशोर वयात प्रवेश केलेल्या जवळपास 400 मुलामुलींबरोबर नियमित संपर्कात राहून वेगवेगळ्या प्रकारचे कृती कार्यक्रमातून जाणीवजागृती, समुपदेशन करण्याचे नियोजन केलेले आहे. वरील अभ्यासावरून खालील काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष व शिफारशी मनोदय व्यसनमुक्ती संस्थेने मांडलेले आहेत.

## प्रमुख निष्कर्ष आणि शिफारसी:

1) पाटील इस्टेट वस्तीमध्ये 72 टक्के कुटुंबे व्यसनाधीन आहेत. शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प असून गळतीचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे पुढील पिढीसाठी कम्युनिटी पातळीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून व्यसनमुक्ती विषयाला प्राधान्य देऊन काम करणे गरजेचे आहे.

2) व्यसनाधीनतेचा प्रश्न गंभीर आहे पण लोकांना त्यातून बाहेर पडण्याचे मार्ग दिसत नाही. कारण वस्ती पातळीवर एक सुद्धा व्यसनमुक्ती केंद्र नाही. शुल्क भरून उपचार घेण्याची आर्थिक परिस्थिती या वंचित आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या समूहांकडे नाही. त्यामुळे वस्ती पातळीवर निशुल्क व्यसनमुक्ती केंद्र सुरु करावेत. ज्यामधून योग्य उपचारपद्धती, मानसोपचार, मार्गदर्शन, जाणीवजागृती, प्रशिक्षण देता येईल.

3) विविध प्रकारच्या सेवा देण्यामध्ये आणि अंगमेहनतीचे काम करणाऱ्यांमध्ये कष्टकरी वर्ग गुंतलेला असल्याने त्यांच्या हलाखीच्या परिस्थितीचा अप्रत्यक्षपणे मध्यमवर्गांवर परिणाम होतो. उदा. कोरोना काळात पाटील इस्टेट मध्ये राहणाऱ्या लोकांना कोरोनासदृश्य लक्षणे आढळली म्हणून बाणेर बालेवाडी भागात त्यांना काम करायला मनाई करण्यात आली. म्हणून वस्तीमधील लोकांचे आरोग्य चांगले राहणे हे अप्रत्यक्षपणे त्यांची सेवा घेणाऱ्या लोकांची देखील जबाबदारी आहे म्हणून नागरी समाजाचे त्यांचे आरोग्यमान सुधारण्यासाठी प्रयत्न करावे.

4) अवैध मद्यपान किंवा धुम्रपान दुकाने वस्तीपातळीवर जास्त असल्याने व्यसनांच्या अधीन होण्याचे प्रमाण जास्त आहे परिणामी झोपडपट्ट्या व्यसनांच्या विळख्यात सापडल्या आहेत. लहान मुले अवैध दुकानात पालकांसाठी दारु आणण्यासाठी जातात यामुळे नंतर हळूहळू पद्यपान सेवनाला सुरुवात करतात. म्हणून वस्तीमध्ये कोणत्याही प्रकारचे अवैध तबांखूजन्य किंवा मद्यपान दुकाने असू नये अशी नियमावली करून त्यांची कडक अंमलबजावणी करावी.

5) देशाचे भविष्य असलेली तरुणाईं व्यसनांमध्ये अडकत आहे. त्यातून मुक्त करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपयायोजना म्हणून समग्र दृष्टिकोनातून वेगवेगळे मनोरंजनात्मक पर्याय/उपाय उपलब्ध करून दिले पाहिजे. उदा. जाणीवजागृती, वाचनालय, समुपदेशन, विविध खेळ, संगणक प्रशिक्षण, व्यायामशाळा (जिम), मुलांच्या मानसिकतेवर कृतीकार्यक्रम, योगाभ्यास, निसर्ग भेट, पथनाट्य, ऐतिहासिक स्थळांना भेटी, व्याख्याने व चर्चासत्र, बुक क्लब इ. अशा सहाय्यक कृतीकार्यक्रमासाठी शासनाने आर्थिक मदत करावेत.

6) वस्त्यांमध्ये व्यसन करणाऱ्यांचे विविध गट आहेत (तरुण मुलं, महिला, मद्यपी पुरुष) त्यांच्या गटानुसार व्यसनांची कारणे आणि परिणाम देखील वेगवेगळे असल्याने प्रत्येक गटांच्या गरजेनुसार विविध उपक्रम तयार करून त्यांची अमंलबजावणी करावी. या अभ्यासानुसार महिलांमध्ये व्यसनांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे व्यसनमुक्ती कार्यक्रमांमध्ये महिलांचा पण समावेश केल्याने कुटुंब व्यसनमुक्त होण्याला मदत होईल.

7) कोणत्याही योजनांची कायद्यांची परिपूर्णता ही ती योजना सुरु करण्यापूर्वी व योजनांच्या अमंलबजावणीनंतर केलेला योग्य माहितीवजा अभ्यास, नियंत्रण-देखरेख, आणि मुल्यमापन यावर त्याचे यशापयश अवलंबून असते. म्हणून समाजातील व्यसनाधिनता कमी करण्यासाठी योग्य माहिती, अभ्यास, मूल्यांकन शासनाने नियमित केले पाहिजे व त्या आधारावर योजनांमध्ये योग्य ते बदल केले पाहिजे.

8) शासनाने योजनांची आणि कायद्यांची तरतूद करताना त्यांचे योग्य मुल्यमापनाबरोबरच ती योजना सातत्याने/निरतंर राबवले पाहिजेत. नियमित जाणीवजागृतीसाठी शासनाने दरवर्षी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर आर्थिक तरतूद केली पाहिजे.

9) कामगार कष्टकऱ्यांची वस्ती ही व्यसनाधिनतेच्या विळख्यात सापडलेली आहे. म्हणून त्यांचे मानसिक स्वास्थ टिकवणे गरजेचे असून त्याचबरोबर त्यांच्या शारीरिक, आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक प्रश्नांमधून बाहेर काढण्यासाठी वस्ती पातळीवर 'मनोदय व्यसनमुक्ती संस्थे'ने अनेक पर्याय निर्माण केले आहेत. उदा. अल्कोहोलिक ॲनानिमसच्या नियमित बैठका (सामूहिक गटोपचार), युथसाठी विविध कौशल्याधारित कृतीकार्यक्रम, सामूहिक खेळ, व्यक्तीगत समुपदेशन, जाणीवजागृती, वाचनालय, मुव्ही क्लब, विविध व्याख्याने इ. अशा कार्यक्रमांसाठी शासनाने आर्थिक तरतूद करावेत.

10) व्यसनाधीनतेवर प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चापेक्षा अप्रत्यक्ष रोग, मृत्यू, गुन्हे, अपघात, आत्महत्या व स्त्रियांवर बलात्कार अशा सामाजिक नुकसानीतून होणारा खर्च पाचपट जास्त असल्याने या प्रश्नांच्या निर्मूलनासाठी समाजकल्याण विभाग, महिला व बाल कल्याण विभाग, शहर विकास विभाग आणि सामाजिक न्याय विभागाने समाजातील सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गांच्या व्यसनमुक्तीसाठी प्राधान्याने काम करावे. तसेच शाळा, सरकारी कार्यालये, पोलिस दल, अन्न व औषध प्रशासन, सरकारी हॉस्पिटल या संस्थांच्या प्रमुखांनी सार्वजनिक ठिकाणी तसेच वस्ती पातळीवर धूम्रपान व मद्यपान सारख्या गोष्टींना मज्जाव करण्यासाठी नियमित धोरणवकिली करावे.

## संदर्भसुचीः


1) दारूबंदी विशेषांक, साधना साप्ताहिक, वर्ष 67, अंक, 35, 4 एप्रिल 2015, पुणे.
2) महेंद्र कानिटकर, होय व्यसनमुक्ती शक्य आहे!, 2016, समकालीन प्रकाशन, पुणे.
3) डॉ.अभय भंग, बीजलेखः महाराष्ट्र की मद्यराष्ट्र? साप्ताहिक साधना, दारूबंदी विशेषांक, एप्रिल 2015, पुणे.
4) भारत आरोग्य मंत्रालय, राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षण, दिल्ली, अहवाल, 2009
5) नॅशनल इन्स्टीटयूट ऑफ मेंटल हेल्थ ॲन्ड न्युरोसायंसेस, बंगलोर, अहवाल.
6) मुलाखतः डॉ. अभय बंग, 7 जुलै 2020.
7) मुलाखतः मुक्ता पुणतांबेकर, 17 जुलै 2020.
8) मुलाखतः पारोमिता गोस्वामी, 19 जुलै 2020.
9) लोकसत्ता; 24 ऑगस्ट 2015
10) सकाळ, 23 एप्रिल 2020



दिवाळी अंकास
हार्दिक शुभेच्छा ...

कॉ. शशी सोनवणे
विरार, मुंबई
मो.नं. 8793608635




# काम हाताला, सन्मानाने जगण्याला...

**अजित अभ्यंकर**
मो. 827 542 4773

- मार्च 2019 मध्ये भारतात बेरोजगारीचे प्रमाण 7 टक्क्यांवर पोचले
- रेल्वेच्या 94000 नोकऱ्यांसाठी, डॉक्टरेट्स सहित, 2 कोटी तरूणांचे अर्ज
- स्टेट बँकेच्या 20 हजार कारकुनांच्या जागांसाठी 24 लाख अर्ज
- 1 हजार युपीएससी जागांसाठी परीक्षार्थींची संख्या 10 लाख
- एम्पीएससी मध्ये बनावट परीक्षार्थींचा सुळसुळाट -त्यांच्या मार्फत सरकारी नोकरीत अधिकारीपदे !
- प्राध्यापकाच्या प्रत्येक जागेसाठी संस्थाचालक करत आहेत 20 लाख रूपयांची खंडणी वसूल.

देशात प्रतिवर्षी उत्तीर्ण होणाऱ्या 15 लाख अभियंते पदवीधारकांपैकी फक्त 7 टक्के नोकरीसाठी लायक( !)-राष्ट्रीय पातळीवरील एका अहवालातील निष्कर्ष

या सारख्या कित्येक बातम्या आपल्या कानावर रोज आदळत आहेत. पोलिस भरती असो की प्रवेश परीक्षा, लाठीमार आणि गोंधळ यांच्याशिवाय ती पार पडूच शकत नाही. कोणताही साधा रोजगार पदरात पाडून घेण्यासाठी लाखो तरूण जीवाची बाजी लावत आहेत.1 हजार जागांसाठी 10-10 लाख जण पळत आहेत; आयुष्यातील 3-3 वर्षे, एकदा नव्हे 4-4 वेळा. 1000 मधून फक्त 1 निवडला जाईल इतकी भयानक स्पर्धा आहे. स्पर्धा की नशिबाचा खेळ हे ठरविणे अशक्य झाले आहे. त्यातून इतके कष्ट करून परीक्षेला बसणाऱ्यांच्या नाकावर टिच्चून बनावट नावाने परीक्षा देणाऱ्यांची संख्या वाढतच चालली आहे. त्यातील काही अधिकाराच्या जागांवर विराजमान झालेले आहेत. त्यात भर म्हणून पुन्हा परीक्षांसाठी निर्माण केल्या गेलेल्या महापोर्टल या भयानक व्यवस्थेने तर हजारो उमेदवारांच्या आयुष्याची बरबादीच सुरू केलेली आहे. पण त्यात काहीही झाले तरी सरकार बदल करण्यास तयार नाही.

**वाचक :** अहो पण थांबा. यामध्ये एवढा गहजब

माजविण्यासारखे काय आहे? स्पर्धा वाढली तर त्यात बिघडले कुठे? त्यातून गुणवत्ता वाढवणे भाग पडते. देशाला चांगले अधिकारी मिळतात. आता कोणी फसवणूक करत असतील, त्याविरोधात पोलीस कारवाई करतच असतात ना!

**लेखक** : यातील सत्य काय ते आपण पाहू. स्पर्धा वाढली तर गुणवत्ता वाढते हे खरे, पण कशाची? इतक्या प्रचंड प्रमाणात म्हणजे 1000 पैकी 999 जणांना नापासच व्हावे लागणार असेल, तर फक्त या स्पर्धा परीक्षा कशा पार करायच्या हे तंत्र आत्मसात करण्याचीच परीक्षा होते. स्पर्धा होते. उमेदवाराच्या ज्या गुणांची तपासणी करण्यासाठी या परीक्षा घेतल्या जातात, त्यांची कितपत परीक्षा होते, हा प्रश्नच आहे. पण सध्या हा मुद्दा वादग्रस्त म्हणून सोडू. आपण त्याची चर्चा स्वतंत्रपणे नंतर करू.

वर उल्लेख केलेल्या युपीएस्सी, एम्पीएस्सी या अधिकारी पदाच्या नोकऱ्या चर्चेतून बाजूस ठेवल्या तरी, अन्य अत्यंत सामान्य नोकरीच्या जागांसाठीदेखील जर इतक्या प्रमाणात आणि ते देखील त्या जागेसाठी आवश्यक पात्रतेपेक्षा किती तरी पट अधिक पात्रता असलेल्या उमेदवारांकडून अर्ज केले जात असतील, तर ते प्रचंड प्रमाणात असणाऱ्या बेरोजगारीचेच लक्षण आहे. नोकरीच्या किती कमी प्रमाणात संधी उपलब्ध आहेत, याचाच तो पुरावा आहे.

**वाचक** : असेच काही म्हणता येणार नाही. कारण असेदेखील असेल की, अधिक पात्रता कागदावर दिसत असली तरी प्रत्यक्षात ते उमेदवार गुणवत्ता धारक नसतातच. त्यामुळेच त्यांना त्यांच्या कथित पात्रतेपेक्षा किती तरी कमी दर्जाच्या नोकऱ्यांसाठी अर्ज करणे भाग पडते. शिवाय असेदेखील म्हणता येईल की, कमी पात्रता आवश्यक असणाऱ्या ठिकाणी जर जास्त पात्रतेचे उमेदवार आले, आणि त्यांना नोकरीत घेतले तर त्यात बिघडले काय? उलट ते चांगलेच झाले,असे समजण्यास काय हरकत आहे?

**लेखक** : यावर आम्ही असा प्रश्न विचारतो की, उच्च शिक्षण- रोजगार आणि देशाचा विकास यांचा काही परस्पर समन्वय आणि संबंध असणे, हे आपण आवश्यक मानायचे की नाही? विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनातील शालान्त परीक्षेनंतरची तारूण्याची 5-6 वर्षे अत्यंत कष्टपूर्वक एखाद्या उच्च शिक्षणाच्या सरकारमान्य आणि नियंत्रित विद्यापीठातून पदवी पदविकेसाठी खर्च करायची; मग ती खाजगी असतील



किंवा सरकारी. पैकी बहुतेकांना खाजगी क्षेत्रात, हे शिक्षण एखाद्या महाग वस्तूप्रमाणे मोठ्या प्रमाणात सरकारमान्य शुल्क देऊन आणि शिक्षण क्षेत्रातील सम्राटांच्या खिशात मोठा नफा टाकूनच खरेदी करावे लागते. त्यासाठी पालकांना आपल्या बचतीचा मोठा त्याग करावा लागतो. किंवा एखादे मोठे शैक्षणिक कर्ज काढावे लागते. आणि हे देखील जमत नसेल, तर आपली जमीन विकावी किंवा गहाण टाकावी लागते. एवढे सर्व केल्यानंतरदेखील, 99 टक्के उमेदवारांसाठी किमान सुरक्षित रोजगाराच्याच संधी उपस्थित नसतील, तर ती पालकांची आणि विद्यार्थ्यांची क्रूर फसवणूक आणि विश्वासघातच नव्हे काय? आता जर या 99 टक्के पदवी धारक उमेदवारांना आपण नालायक असल्याचे समजून त्यांच्या वैयक्तिक गुणहीनतेमुळेच त्यांना रोजगार मिळत नसल्याचे सांगणार असू, तर तो खरे म्हणजे विद्यापीठांवरचाच आणि या शिक्षणव्यवस्थेचे संचालन करणाऱ्या सरकारवरचादेखील उघड अविश्वास नव्हे काय? आणि मुख्य म्हणजे उच्च शिक्षण- रोजगार आणि विकास यांच्यामध्ये इतका विसंवाद चालविणाऱ्या व्यवस्थेचे दिवाळे वाजल्याचीच ही कबुली नव्हे काय?

म्हणून आम्ही म्हणतो की, वर दिलेल्या बातम्या म्हणजे, या सर्व फसवणुकीचीच भीषण उदाहरणे आहेत. देशातील एका मोठ्या संकटाची ती लक्षणे आहेत. त्याचा सखोल विचार करणे आवश्यक आहे.



## बेरोजगारीच्या समस्येचा आकार आणि स्वरूप

आज देशांत सर्व वयांतील सर्व स्त्री-पुरूष कामकरी लोकसंख्येशी तुलना केली तर बेरोजगारांचे प्रमाण 6.1 टक्क्यांवर पोचले आहे. (कामकरी लोकसंख्या याचा अर्थ 15 पेक्षा जास्त वयातील काम करणारे आणि शोधणारे असे सर्व स्त्री-पुरूष) पण फक्त 15 ते 29 हा वयोगट विचारात घेतला तर हेच प्रमाण 17 टक्क्यांवर आहे. सर्व वयोगटांतील 10 पेक्षा जास्त शिक्षण झालेल्यांचे हेच प्रमाण 14 टक्के आहे.

**वाचक** : प्रथम हे सांगा की, ही आकडेवारी आणली कोठून? त्याची विश्वासार्हता काय?

**लेखकः** वरील सर्व आकडेवारी ही भारत सरकारच्या पीरीऑडिक लेबर फोर्स सर्वे रिपोर्ट (PLES) या 2019 मे मध्ये प्रकाशित झालेल्या अहवालावर आधारित आहे. काही ठिकाणी सेंटर फॉर मानिटरिंग इंडियन इक ॉनॉमी (CMIE) या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या संशोधन संस्थेच्या आणि आंतरराष्ट्रीय श्रम संघटन (ILO) आकडेवारीचा आधार घेतला आहे. प्रत्येक वेळा त्याचा स्वतंत्र उल्लेख करण्यात आलेला आहे.

**वाचक** : अहो, पण तुम्ही रोजगारामध्ये फक्त नोकरी करणारेच धरता ना? हे चूक आहे. कारण स्वतःचा छोटा व्यवसाय करणे, अगदी हातगाडी लावून भजी-चहा तयार करून विकण्याचा व्यवसाय करणे हा देखील रोजगार असतोच ना?

**लेखक** : तुमचा काहीतरी गैरसमज झालेला आहे. या पुस्तिकेत दिलेल्या सर्व आकडेवारीमध्ये रोजगार या व्याख्येत कोणत्याही स्वरूपाचा विनिमयासाठी केलेला आर्थिक व्यवहार याचा समावेश केलेला आहे. म्हणजे शेती, व्यापार, स्वतःचा कोणताही व्यवसाय, कोणतीही नोकरी, रोजंदारी अथवा मासिक मजुरी, पथारी, वाहतूक व्यवसाय इत्यादी सर्व प्रकारच्या उदरनिर्वाहासाठीच्या नियमित तसेच अनियमित जीविकांचा आणि साधनांचा समावेश केलेला आहे.

असो. आता पुढे हे लक्षात घ्यावे लागेल की, बेरोजगारीची समस्या ही केवळ काही व्यक्तिंची 'आर्थिक' समस्या नाही; केवळ युवकांची तर नाहीच नाही. देशासाठी ती सार्वत्रिक अरिष्टाची आणि सामाजिक अधःपतनाची सुरूवात आहे.

व्यक्तिगत पातळीवरून पाहिले, तर ती गंभीर मानवी समस्या आहे. युवकांना अर्थहीनतेकडे नेणारी कोंडी आहे. मी काम करण्याच्या वयातील आहे. मला काम करण्याची इच्छा आहे, माझ्याकडे सामाजिक